ज्ञापन पत्र — सौर उर्जा


महाराष्ट्र शासन
विद्युत निरीक्षक, अकोला यांचे कार्यालय
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासकीय दुध योजना परिसर, मुर्तीजापुर रोड, अकोला

E-Mail ID:- eiakolamah@gmail.com दूरध्वनी क्रमांक :- ०७२४-२४५९५२२


जा.क्र.विनीअ/ 846 /२०२१ दिनांक- 24/05 /२०२१

प्रती,

अधीक्षक अभियंता
महावितरण, सं व सु मंडळ,
अकोला

**विषय :- ऑन-ग्रीड (On-Grid) सौर उर्जा प्रकल्पाचे विद्युत जोडणी बाबत**
**संदर्भ :- केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठा संबंधीचे उपाय) विनियम, २०१० विनियम क्र. २९**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठा संबंधीचे उपाय) विनियम, २०१० चे विनियम क्र. २९(१) अन्वये कुठलाही विद्युत ग्राहक, विद्युत पुरवठादार कंपनी यांच्या विद्युत संच मांडणी उभारणीची जबाबदारी फक्त शासन मान्यताप्राप्त विद्युत कंत्राटदार यांची आहे. तसेच, सदर कार्य फक्त मान्यताप्राप्त विद्युत पर्यवेक्षक यांच्या निगराणी मध्येच होणे आवश्यक आहे.

तसेच, विनियम क्र. २९(२) अन्वये, जर विद्युत संच मांडणीची उभारणी शासन मान्यताप्राप्त विद्युत कंत्राटदार यांच्या मार्फत करण्यात आली नसल्यास; अश्या विद्युत संचमांडणीला विद्युत पुरवठा देण्यात येवू नये असे स्पष्ट नमूद आहे. असे असताना देखील महावितरण,सं व सु, मंडळ, अकोला अंतर्गत; अविद्युतीय कंत्राटदार मार्फत उभारण्यात आलेल्या विविध ऑन-ग्रीड (On-Grid) सौर उर्जा प्रकल्पांस विद्युत जोडणी देण्यात आले असल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे.

सबब, यापुढे **फक्त शासन मान्यताप्राप्त विद्युत कंत्राटदार मार्फतच** उभारण्यात आलेल्या ऑन-ग्रीड (On-Grid) सौर उर्जा प्रकल्पांस विद्युत जोडणी देण्यात यावी किंवा नेट मीटरिंग बद्दलची कार्यवाही करण्यात यावी. अविद्युतीय कंत्राटदार यांच्या मार्फत उभारलेल्या सौर उर्जा वीज संच मांडणीस विद्युत जोडणी न देणेबाबत आपल्या अधिनस्थ क्षेत्रीय अभियंत्यास सूचित करण्यात यावे.

(संजय ए. आंबेकर)
विद्युत निरीक्षक
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
विद्युत निरीक्षक कार्यालय
अकोला

**सहपत्र :-** विनियम क्र. २९ (छायांकित प्रत)

**प्रत :-** अधीक्षक अभियंता, नागपूर प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रत :-** मुख्य अभियंता, महावितरण, प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

**प्रत :-** प्रादेशिक संचालक, महावितरण, सं व सु प्रादेशिक परीमंडळ, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

**प्रत :-** मुख्य अभियंता, महावितरण, सं व सु परीमंडळ, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

**प्रत :-** प्रकल्प व्यवस्थापक, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा),अमरावती माहिती व अनुपालनसाठी

**प्रत :-** कार्यकारी अभियंता, महावितरण, सं व सु विभाग, अकोला ग्रामीण / अकोला शहर / अकोट माहिती व अनुपालनसाठी

Add No. 3
4/6/2021 01/6/2021

Akola Amravati Division | 2023.04.11 12:06